REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 8 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2019

# भारतातील स्वातंत्र्यपुर्व काळातील महिला समाजसुधारक

मिलिंदकुमार खेळकर
सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर.

## प्रस्तावना



भारत देशासारख्या पुरुषप्रधान देशात नेहमीच पुरुषांनी केलेले कर्तव्य आणि सेवा अधोरेखित केली जाते तर महिलांची कामगिरी नेहमीच झाकोळली जाते. पण आज भारतीय महिला कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत हे वेळोवेळी सोदाहरण प्रत्ययास येत आहे. पूर्वीच्या काळी महिलांना शैक्षणिक, राजकीय, आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात नाममात्र संधी मिळत होती त्यामुळे त्यांच्यातील सुप्त गुणांचा फारसा विकास होत नसे पण तरीही ज्या महिलांना संधी मिळाली त्यांनी संधीचे सोने केलेले त्यांच्या कर्तुत्वावरून दिसून येते. या संशोधन पेपर मध्ये भारतातील काही महिला समाजसुधारकांच्या कार्याचा उहापोह करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे

## 1. सावित्रीबाई फुले

सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका होत. सावित्रीबाई फुले यांचा जन्म महाराष्ट्रातील नायगाव येथे 3 जानेवारी 1831 ला झाला. त्या नऊ वर्षाच्या असताना त्यांचा विवाह महात्मा ज्योतिबा फुले यांच्याशी झाला. सावित्रीबाई फुले यांचा भारतातील ब्रिटिश काळात महिलांचा दर्जा सुधारण्यात आणि जातीय दडपशाही नष्ट करण्यात मोलाचा वाटा होता . सावित्रीबाई फुले या खंबीर समाज सुधार होत्या. त्यांचा असा विश्वास होता की शिक्षणाचा उपयोग समाजातील वाईट गोष्टी दूर करण्याकरता एक शस्त्र म्हणून केला पाहिजे. ज्या काळात मुलींना शिक्षण घेणे शक्य नव्हते त्या काळात त्यांनी लिंगादिष्टीत भेदभावाविरुद्ध लढा दिला आणि मुलींच्या शिक्षणाकरिता एक मजबूत असा पाया तयार केला. मुलींना शिक्षण देण्याचे कार्य करीत असताना प्रसंगी त्यांना समाजा द्वारे होणारा अपमान, शेण आणि दगड विटांचा मारा यांचा सामनाही करावा लागला. ऑगस्ट 1948 मध्ये सावित्रीबाई फुले आणि ज्योतिराव फुले यांनी भारतातील मुलींसाठी पहिली शाळा स्थापन केली. 1851 पर्यंत सावित्रीबाई आणि ज्योतिराव फुले यांनी पुणे शहरात तीन शाळा स्थापन केल्या. याद्वारे त्यांनी शिक्षणाचे महान असे कार्य केले. सावित्रीबाई यांनी बालविवाहाच्या विरोधात लढा देत महिलांच्या हक्कासाठीही लढा दिला आणि अखेरीस त्यांचा हा उपक्रम

यशस्वी झाला. सावित्रीबाई फुले यांनी मृत्यूपर्यंत पती ज्योतीराव फुले यांचे जाती आणि लिंगभेद दूर करण्याचे प्रयत्न सुरू ठेवले त्यांनी 'बालहत्या प्रतिबंधक गृहाची' स्थापना केली. याद्वारे त्यांनी स्त्रीभ्रूणहत्या रोखण्याचा आणि बलात्कार पीडित महिलांची प्रसुतीबाबत न्याय देण्याचा प्रयत्न केला. सावित्रीबाई फुले यांचा मृत्यू 10 मार्च 1897 मध्ये झाला.

## 2. ताराबाई शिंदे

ताराबाई शिंदे यांचा जन्म महाराष्ट्रातील बुलढाणा येथे 1850मध्ये झाला. त्या जोतीबा फुले यांच्या' सत्यशोधक समाजाच्या 'कार्यकर्त्या होत्या .तत्कालीन महाराष्ट्रातील स्त्री समाजसुधारकम्हणून त्याचा उल्लेख केला जातो .

ताराबाई शिंदे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत देखील सामाजिक सुधारणांच्या क्षेत्रात योगदान दिले .त्यानी स्त्रियांच्या शोषणाविरोधात दिलेला लढा हा सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेस चालना देणारा होता. त्यांचा' स्त्री-पुरुष तुलना नावाचा निबंध १८८२ मध्ये प्रसिद्ध झाला .या निबंधात त्यांनी हिंदू विश्वास प्रणालींना आव्हान दिले आणि हिंदू संस्कृतीत खोलवर रुजलेल्या पुरुषसत्ताक मूल्यांचे समाजावर झालेले विध्वंसक परिणाम उघड केले .ताराबाई या पहिल्या स्त्री वाद्यांपैकी एक होत्या ज्यांनी स्त्रियांच्या विरुद्ध लिंग भावावर आधारित होणारा भेदभाव आणि जातीयअसमानता यावर टीका केली .समाजात स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारात हिंदू धर्माची असणारी भूमिका यावर त्यांनी प्रकाश टाकलात्यांनी. केशवपनासारख्या दुष्ट रूढी, तसेच पुरुषांना अनेक लग्न करण्याचीअसलेली मुभा या सर्व प्रश्नांवर टीका केली . ताराबाईंच्या मते ,स्त्री ही पुरुषपेक्षा अधिक शोषिक, अल्पसंतुष्ट, पुरुष प्रेमाची भुकेली असते .तरी सुद्धा स्त्रीच्या वाट्याला उपेक्षा, वंचना, शोषण व यातना येतात .हे सर्व दूर व्हावे व समाजात स्त्री- पुरुष समानता यावीअशीअपेक्षा त्या व्यक्त करतात.आधुनिक भारतातील जातीय दडपशाही आणि लैंगिक असमानता यांची व्याख्या करण्यासाठी त्यांच्या लेखनाचा वापर करण्यात येतआहे.

## 3. रमाबाई रानडे

25 जानेवारी 1862 रोजी जन्मलेल्या रमाबाईंचे बालपण महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यात गेले. रमाबाई यांनी 19 व्या शतकाच्या मध्यात भारतातील पुणे येथे मुलींचे उच्च माध्यमिक विद्यालय स्थापन केले रमाबाईंच्या वडिलांना मुलीच्या शिक्षणात रस नव्हता कारण त्यावेळी मुलींना शिक्षण घेणे निषिद्ध होते .तथापि, त्यांचे पती महादेव गोविंद रानडे यांनी त्यांना शिकविले.

माफक पार्श्वभूमी असूनही रमाबाईंनी सामाजिक क्षेत्रात विविध प्रकारचे कर्तृत्व गाजवले .त्यांनी पहिली भारत महिला परिषद सुरू केलीआणि भारतीय महिला परिषदेच्या पहिल्या सत्राचे अध्यक्षपद भूषवले .या कामात त्यांना न्यायमूर्ती रानडे यांचे प्रचंड सहकार्य आणि प्रोत्साहन मिळाले.

महिलांच्या हितासाठी त्यांनी मोठे कार्य केले .महिला कैद्यांमध्ये आत्मसन्मान जागृत करण्यासाठी त्या कारागृहातील महिला कक्षात जात असत .त्यांनी दुष्काळग्रस्त लोकांसाठी मदतीचे आयोजन केलेआणि त्यांची काळजी घेतली व त्यांना मदतकेली .त्या सेवासदन संस्थेच्या अध्यक्षाही राहिल्यात .महिलांना विविध जीवन कौशल्ये शिकवण्याचा सेवासदन संस्थेचा मानस होता.

सेवासदन संस्थे अंतर्गत महिला प्रशिक्षण महाविद्यालय आणि तीन वसतिगृहे विकसित करण्यात आली होती . येथे रमाबाई रानडे यांनी गरीब महिला आणि विधवांना मदत केली आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या स्थिर होण्यासाठी प्रशिक्षण दिले .त्यांच्या प्रयत्नांमुळे संस्थेचा महाराष्ट्रातील आठ शाखांमध्ये विस्तार झाला.

## 4. फातिमाशेख

भारतातील महिला समाजसुधारकांपैकी एक असणाऱ्या फातिमा बेगम शेख ह्या आपल्या इतिहासाच्या पुस्तकांमध्ये फारशा ज्ञात नाहीत .फातिमा बेगम शेख ह्या पुण्याच्या रहिवासी होत्या , त्यांचा जन्म 9 जानेवारी 1831

रोजी झाला होता .फातिमा या समाजसुधारक ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या सहकारी होत्या .ज्योतिराव आणि सावित्रीबाई फुले यांच्या सामाजिक सुधारणेच्या यशात त्यांचा मोलाचा वाटा होता .

1848मध्ये, फातिमा शेख यांनी फुले यांच्या समवेत भारतातील पहिल्या मुलींच्या शाळेची सह-स्थापना केली . लिंगभावावर आधारित सामाजिक भेदभावाचे अडथळे मोडून फातिमा शेख भारतात शिकवणारी पहिली मुस्लिम महिला ठरली .सामाजिक अडथळे पार करणाऱ्या आणि पूर्वग्रहांना आव्हान देणाऱ्या महिलांसाठी त्या एक आदर्श आहेत . खालच्या जातीतील लोकांना शिक्षण देण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले.

शेख या भारताच्या स्त्रीवादी चळवळीच्या नेत्या होत्या .भारतीय समाजातील महिलांना दर्जेदार शिक्षण मिळवून देण्याचे त्यांचे कार्य देशाच्या कायम स्मरणात राहील.

### 5. स्वर्णकुमारीदेवी

स्वर्णकुमारी देवी बंगाली लेखिका, कवयित्री, सामाजिक कार्यकर्त्या आणि सखी समितीच्या संस्थापक आहेत . त्यांचा जन्म 28 ऑगस्ट 1855 रोजी झाला .1896 मध्ये त्यांनी सखी समिती सुरु केली .या संस्थेने वंचित महिलांना मदत करण्याचे काम केले .सखी समितीने विधवा आणि अनाथांच्या संगोपनाची संपूर्ण जबाबदारी घेतली .त्यांना आवश्यक कौशल्ये शिकवून त्यांना शिक्षित करून स्वावलंबी आणि आर्थिक दृष्ट्या स्थिर करण्याची काळजी घेतली . संस्थेसाठी निधी उभारण्यासाठी समिती प्रदर्शने भरवत असे.

त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनात भाग घेतला 1929 .मध्ये, त्यांची वांगी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष पदासाठी निवड झाली.

लेखिका म्हणूनही त्या लोकप्रियता होत्या. कलकत्ता विद्यापीठातून जगतारिणी सुवर्णपदक मिळवणाऱ्या त्या पहिल्या बंगाली महिला लेखिका होत्या .भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पहिल्या महिला प्रतिनिधी स्वर्णकुमारी आणि कादंबिनी गांगुली होत्या.

विशेषत :स्त्रियांमध्ये, वैज्ञानिक शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी त्यांचे भरीव योगदान आहे. लेखिका म्हणून यश मिळवणाऱ्या बंगालमधील महिलांपैकी पहिल्या एक म्हणून त्यांना भारतीय इतिहास काँग्रेस कडून मान्यता मिळाली आहे.

### 6. कादंबिनी गांगुली

कादंबिनी बोस गांगुली यांचा जन्म 18 जुलै 1861 रोजी भागलपूर येथे झाला. त्यांना भारतात औषधोपचार करणाऱ्या, डॉक्टर म्हणून व्यवसाय करणाऱ्या पहिल्या भारतीय महिला मानले जाते. 1884 मध्ये कलकत्ता मेडिकल कॉलेज मध्ये प्रवेश मिळवणाऱ्या त्या पहिल्या विद्यार्थिनी होत्या. नंतर त्यांनी स्कॉटलंड मध्ये प्रशिक्षण पूर्ण केले आणि भारतात वैद्यकीय सराव सुरूकेला .त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पहिल्या महिला वक्त्या म्हणूनही काम केले.

कादंबिनी यांच्या बालपणावर बंगालच्या पुनर्जागरणाच्या चळवळीचा जोरदार प्रभाव होता .तिचे वडील ब्रजकिशोर बसू हे ब्राह्मोसमाजाचे प्रसिद्ध कार्यकर्ते होते 1863 .मध्ये त्यांनी भागलपूर महिला समितीची सह-स्थापना केली, जी महिलांच्या मुक्तीसाठी प्रयत्न करणारी पहिली संस्था होती.

कादंबिनी यांनी बंग महिला विद्यालयातील प्रसिद्ध ब्राम्हो समाज नेते द्वारकानाथ गांगुली यांच्याशी लग्न केले, जे त्यांच्यापेक्षा 20 वर्षांनी मोठे होते.

दोघांनी मिळून पूर्व भारतातील महिला कोळसा कामगारांसाठी त्यांच्या कामाची परिस्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न केले .भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पाचव्या अधिवेशनात त्या पहिल्या महिला प्रतिनिधी मंडळाच्या सदस्या होत्या . बंगालच्या फाळणीच्या वेळी ऐक्य दाखवण्यासाठी कादंबिनी यांनी 1906 मध्ये कलकत्ता येथे महिला परिषद भरवली आणि 1908मध्ये तिचे अध्यक्षपद भूषवले .त्यांनी सक्रियपणे सत्याग्रहाचा प्रचार केला, कामगारांच्या कल्याणास्तव पैसा उभा करून त्यांच्या हक्कासाठी लढा दिला.

### 7. भगिनी निवेदिता

सिस्टर निवेदिता या भारतीय समाजसुधारक आणि महिला राजकीय कार्यकर्त्या होत्या 28 .ऑक्टोबर 1867 रोजी आयर्लंड मध्ये जन्मलेल्या मार्गारेट एलिझाबेथ नोबल या ख्रिश्चन महिलेने स्वामी विवेकानंदांनी दिलेले "निवेदिता" हे नाव स्वीकारले. त्या 28 जानेवारी 1898 मध्ये स्वामी विवेकानंदांच्या विचाराने प्रभावित होऊन भारतात आल्या. त्या ब्रिटीश राजवटीच्या प्रखर विरोधक होत्या आणि भारतीय सार्वजनिक प्रतिकाराला त्यांनी पाठिंबा दिला होता.

शैक्षणिक दृष्ट्या वंचित मुली-महिलांसाठी त्यांनी कलकत्ता येथे 'निवेदिता बालिका विद्यालय' शाळा सुरू केली . त्या घरोघरी जाऊन महिला व मुलींना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत असत .त्यांच्या शाळेत फक्त मुलीच होत्या असे नाही तर प्रौढ महिला आणि विधवा देखील होत्या .त्यांनी कोणत्याही जातीपाती चा विचार न करता सर्व महिलांच्या उन्नतीसाठी काम केले.

1899 मध्ये कलकत्ता येथे आलेल्या प्लेगच्या साथीच्या काळात त्यांनी स्वताच्या जीवाची परवा न करता रुग्णांसाठी अथक काम केले .भगिनी निवेदिता यांनी अनेकदा स्वच्छता मोहीम राबविली आणि या उपक्रमात तरुणांना स्वयंसेवक होण्यासाठी प्रोत्साहित केले .

त्यांनी सामाजिक सुधारणांना नेहमी पाठिंबा दिला, राष्ट्रीय कला आणि संस्कृतीचा पुरस्कार केला आणि त्याचा प्रचार प्रसार केला. भगिनी निवेदिता स्त्री वादी म्हणून प्रसिद्ध होत्या .त्या भारताच्या स्वातंत्र्याच्या खंबीर समर्थक होत्या . त्या स्वातंत्र्यवादी चळवळीत सक्रिय होत्या आणि महात्मा गांधींसारख्या अनेक प्रमुख नेत्यांसोबत त्यांनी काम केले. 13 ऑक्टोबर 1911 ला दार्जीलिंग येथे त्यांचे निधन झाले.

### 8.पंडिता रमाबाई

सध्याच्या कर्नाटकात जन्मलेल्या पंडिता रमाबाई या संस्कृत विद्वान म्हणून पंडिता ही पदवी मिळविणाऱ्या पहिल्या महिला ठरल्या .पंडिता रमाबाईंचा जन्म 23एप्रिल 1858 रोजी एका श्रीमंत आणि विशेषाधिकार प्राप्त अशा डोंगरे नामक कुटुंबात झाला .त्यांच्या प्रगतीशील पालकांनी मुलींच्या शिक्षणावर मर्यादा घालणाऱ्या पारंपारिक सामाजिक नियमांना धुडकावले आणि रामाबाईला शिकविले .

रमाबाईंनी आपले संपूर्ण आयुष्य एक शिक्षक आणि समाजसुधारक म्हणून व्यतीत केले .वडिलांकडून त्या संस्कृत शिकल्या .नंतर त्यांनी भारतभर प्रवास केला आणि कलकत्ता विद्यापीठाने त्यांना पंडिता आणि सरस्वती ही पदवी बहाल केली.

महिलांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि बालविवाहाच्या विरोधात काम करण्यासाठी आणि पीडितांची सुटका करण्यासाठी त्यांनी आर्य महिला समाजाची स्थापना केली .ब्राह्मोसमाज, हिंदूसुधारक आणि ख्रिस्चन मिशनरीझ या सर्वांच्या समाज कार्याचा आणि त्यांच्या ध्येय्याचा पंडिता रमाबाई वर खूप मोठा प्रभाव होता.

महिलांना डॉक्टर बनवण्यासाठी महिला शिक्षण आणि वैद्यकीय शिक्षणाची कास धरणारे एक महत्वाचे व्यक्तिमत्त्व म्हणून रमाबाई यांना ओळखले जाते .त्यांच्या समाजकार्याचा प्रभावच असा होता की त्यांचा आवाज राणी व्हिक्टोरिया पर्यंत पोहोचला आणि महिलांसाठी वैद्यकीय शिक्षणाची सोय लेडी डफरिनने भारतात सुरू केली.

व्याख्याने देऊन आणि अनुयायांचे एक मोठे नेटवर्क तयार करून, रमाबाईनी अंदाजे 60,000 रुपये गोळा केले आणि बालविधवांसाठी शाळा सुरू केल्या.

त्यांनी 1889 मध्ये अनेक हिंदू सुधारकांच्या मदतीने पुण्यात बालविधवांसाठी 'शारदासदन' नावाची संस्था स्थापन केली आणि नंतर त्या संस्थेला 'एम.जी .रानडे मुक्तीमिशन' हे नाव दिले .

1896 मध्ये भीषण दुष्काळात त्यांनी हजारो गरजूंना वाचवले आणि मदत केली . अबला स्त्रियांची हलाखीची परिस्थिती, पुरुष व अन्य महिलांकडून त्यांची होणारी पिळवणूक, अनिष्ठ रूढी व परंपरा या विरुद्ध त्यांनी आवाज उठविला. कुमारी मातांसाठी केंद्र, स्त्री सहाय्यता केंद्र, गरीब मुलांसाठी शाळा, असे अनेक उपक्रम राबवून त्यांनी स्त्री शिक्षणाची चळवळ पुढे चालू ठेवलीमहाराष्ट्रात नऊवारी ऐवजी पाचवारी साडी नेसण्यास महिलांनी सुरुवात करण्यामागे

पंडिता रमाबाई यांचे प्रयत्न होते. त्यांनी मूळ हिब्रू आणि ग्रीक भाष्येमधील बायबलचे मराठीत भाषांतर केले .त्यांचे सात भाषांवर प्रभुत्व होते. त्यांचे 5 एप्रिल 19 22 रोजी केडगाव ,पुणे येथे निधन झाले.

### 9. उषा मेहता

25 मार्च 1920 रोजी सुरत जवळील एका खेड्यात जन्मलेल्या उषा मेहता या भारतीय स्वातंत्र्यसैनिक आणि गांधी समर्थक होत्या .उषा यांनी , वयाच्या 8 व्या वर्षी, 1928मध्ये सायमन कमिशनच्या निषेध मोर्चात भाग घेतला . त्यांनी लहानअसताना महात्मा गांधींना पहिल्यांदा पाहिले आणि तेथूनच त्यांना खादी परिधान करण्याची आणि देशसेवा करण्याची प्रेरणा मिळाली.

त्यांनी मुंबई विध्यापिठातून तत्वज्ञान या विषयातून स्नातक ची पदवी प्राप्त केली आणि त्यानंतर कायद्याच्या पदवीचाअभ्यास सुरूकेला, पण भारत छोडो आंदोलनात सामील होता यावे म्हणून 1942 मध्ये शिक्षण सोडले.

ज्येष्ठ नेते राम मनोहर लोहिया यांनी मदत केलेल्या 'गुप्त काँग्रेस रेडिओशी' संबंध असल्याबद्दल पोलिसांनी उषा मेहता यांना ताब्यात घेतले आणि त्यांना चार वर्षासाठी येरवडा तुरुंगात डांबले .त्यावेळचे अंतरिम सरकारचे गृहमंत्री मोरारजी देसाई यांनी त्यांची सुटका करण्याचा आदेश दिला, ज्यामुळे त्या कैदेतून सुटलेल्या पहिल्या महिला राजकीय कैदी बनल्या. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर त्यांनी गांधीजींच्या सामाजिक आणि राजकीय विचारांवर मुंबई विध्यापिठातून पी.एच .डी. पदवी मिळवली. त्यांनी इंग्रजी आणि गुजराती भाषांमधून अनेक पुस्तके लिहिली. मध्ये त्यांना पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यातआले .भारतछोडो आंदोलनाच्या प्रत्येक वर्धापनदिनात मेहतास हभागी होत असत 11 . ऑगस्ट 2000 रोजी त्यांचे वयाच्या 80 व्या वर्षी निधन झाले.

### निष्कर्ष

समाजसुधारणा आणि स्वातंत्र्यलढ्यात भारतीय महिलांचे भरीव असे योगदान राहिले आहे. सध्याच्या परिस्थितीत भारतीय महिलांनी देशातील काही प्रतिष्ठित पदे भूषवून सौंदर्य, सामर्थ्य आणि बुद्धिमत्तेचे उदाहरण प्रस्थापित केले आहे. समाज सुधारणा आणि विकासाच्या प्रक्रियेला चालना मिळण्याच्या हेतूने भारतीय समाजातील पुरुषांप्रमाणेच महिलांच्याही सामाजिक योगदानाची माहिती समाजाला होणे अतिशय आवश्यक ठरते. भारतात अशा अनेक स्त्रिया झाल्यात ज्यांनी जीवनातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय अशी कामगिरी केली आहे. भारतीय समाज सुधारण्याच्या कार्यात पुरुष समाजसुधारकाप्रमाणेच महिला समाजसुधारकांचेही मोलाचे योगदान राहिले आहे.

### संदर्भ

1. *Chavan, Vishwas .15-06-2012 Vishwasutras: Universal Principles for Living: Inspired by Real-Life Experiences इंग्रजीभाषेत AuthorHouse. ISBN .9781468581638*
2. *भारतीय समाजसुधारक विकीपेडिया*
3. *महाराष्ट्राच्या पंचकन्या :'सावित्रीबाई फुले', 'पंडिता रमाबाई', 'लक्ष्मीबाई टिळक', 'रमाबाई रानडे', 'आनंदीबाई कर्वे', लेखक - अशोक बेंडखळे, राजा प्रकाशन, मुंबई*
4. *थोर महिला, नेत्रदिप, :netradip.blogspot.com*